दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २७२ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.३० डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## नववर्षानिमित्त रात्री आठ विशेष लोकल धावणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नववर्षाच्या स्वागतासाठी मुंबईत येणाऱ्या आणि मुंबईतून परतीचा प्रवास करणाऱ्या पर्यटक आणि प्रवाशांचा रात्रकालीन प्रवास वेगात होण्यासाठी, पश्चिम रेल्वेद्वारे आठ विशेष लोकल चालवण्यात येतील. समुद्र किनारी, पर्यटक स्थळी ३१ डिसेंबरच्या रात्री जल्लोष करणाऱ्या पर्यटकांना या विशेष लोकलमुळे मोठा दिलासा मिळेल.

पश्चिम रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी मध्यरात्री १.१५ वाजता चर्चगेटवरून पहिली विशेष लोकल सुटून रात्री २.५५ वाजता विरारला पोहोचेल.

रात्री २ वाजता दुसरी लोकल चर्चगेटहून सुटून रात्री ३.४० वाजता विरारला पोहचेल. तिसरी लोकल रात्री २.३० वाजता चर्चगेटहून सुटून पहाटे ४.१० वाजता विरारला पोहोचेल. तर, चौथी लोकल पहाटे ३.२५ वाजता चर्चगेटहून सुटून विरारला पहाटे ५.०५ वाजता पोहचेल.

# सिडको उपनगरांसाठीचा पहिला जलबोगदा आरपार

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

मुंबईनंतर पहिल्यांदाच मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात सिडको निर्माण करत असलेल्या उपनगरांना यापुढे हेटवणे धरण प्रकल्पातील २९ किलोमीटरच्या भूमिगत जलबोगद्याने पाणी वितरण केले जाणार आहे. या जलबोगद्याच्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील साडेपाच किलोमीटर लांबीचा पहिला जलबोगदा सोमवारी वहाळ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या उपस्थितीत आरपार झाला. यावेळी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे कार्यकारी अध्यक्ष कृष्णमूर्ती सुब्रमण्यन, सिडकोच्या मुख्य अभियंता शिला करूणाकरण व इतर अधिकारी उपस्थित होते. सोमवारी या बोगद्याचा अंतिम सव्वा मीटरचा भाग उपस्थितांसमोर भव्य टीबीएम यंत्राने खणून हा बोगदा आरपार (ब्रेकथ्रू) खणल्यानंतर उपस्थितांनी फटाके वाजवून, हवेत फुगे सोडून आणि जोरदार संगितासह टाळ्यांच्या गजरात हा जल्लोष साजरा केला. अत्यंत कठीण भूगर्भीय व अभियांत्रिकी आव्हानांवर मात करून सिडको महामंडळाच्या इतिहासातील हा पहिला जलबोगद्याचे काम यशस्वी खणण्यामुळे २०२८ पर्यंत सिडकोच्या उपनगरांना पाणी मिळू शकणार आहे.




नवी मुंबई, उरण व पनवेल परिसरात सिडको मोठ्या प्रमाणात शहरांसह विविध प्रकल्पांतून विस्तार करत आहे. या भागांतील वाढती पाण्याची गरज भागवण्यासाठी सिडकोने पुढील २५ वर्षांची सूमारे १२७५ दश लक्ष लीटर (एमएलडी) पाण्याची मागणी ध्यानात घेऊन अनेक जलप्रकल्प हाती घेतले आहेत. यापैकी हेटवणे जलावर्धन प्रकल्प हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी सूमारे २४०० कोटी रूपये खर्च केला जात असून या प्रकल्पामध्ये १३.२५ किलोमीटर लांबीचा कच्च्या पाण्याचा बोगदा तसेच १५.४ किलोमीटर लांबीचा शुद्ध पाण्याचा बोगदा उभारण्यात येत आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सिडकोची जलपुरवठा क्षमता सध्याच्या १२० दशलक्ष लिटर प्रतिदिनवरून २७० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतकी वाढणार आहे.

सोमवारी बोगदा ब्रेकथ्रू या प्रकल्पातील पॅकेज-१ मधील वहाळ गावातील शाफ्ट क्रमांक ४ येथे झाला. पॅकेज-१ चे काम ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करत असून, या पॅकेजमध्ये ८.७ किमी लांबीचा शुद्ध पाण्याचा बोगदा समाविष्ट आहे. आतापर्यंत ५.५२ किमी बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे.

हा टप्पा गाठताना सिडकोचे अभियंते आणि ॲफकॉन्सच्या टीमने अनेक भूगर्भीय, अभियांत्रिकी व इतर आव्हानांवर मात केली. हा जलबोगदा खोदण्याचे काम जमिनीखाली सुमारे १०० मीटर खोलीवर करण्यात येत आहे. सूमारे ३.२ मीटर व्यासाच्या बोगद्याचा मार्ग सह्याद्री पर्वतरांगांतील बेसॉल्ट सारख्या गुंतागुंतीच्या खडकातून जातो. मर्यादित जागेमुळे यंत्रसामग्री उभारणी व हालचालींमध्ये अडचणी येत होत्या, तसेच उत्खननातून निघालेला मलबा आणि त्याची गाडीतून वाहतूक करून बाहेर आणणे अशा प्रकारच्या बोगद्याच्या सर्वात आव्हानात्मक काम असते. सिडको अभियंते व ॲफकॉन्सच्या टीमच्या समन्वयामुळे या सर्व अडचणी यशस्वीपणे दूर करण्यात आल्याची माहिती ॲफकॉन्स कंपनीचे वरिष्ठ अधिकारी कृष्णमूर्ती सुब्रमण्यन यांनी दिली.

या प्रकल्पाला ॲफकॉन्स कंपनीने ‘फ्लेमिंगो’ टनेल बोरिंग मशीन असे नाव दिले होते. एका महिन्यात ७७७ मीटर बोगदा खोदण्याचा नवा राष्ट्रीय विक्रम ॲफकॉन्स समुहाने प्रस्थापित केला असून यापूर्वी ७१४ मीटरचा विक्रम स्वता ॲफकॉन्सनेच केल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यंदाच्या वर्षी सिडको नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू करण्याय यशस्वी झाली तसेच या वर्ष अखेरीस सिडकोच्या इतिहासात पहिल्यांदा जलबोगदा आरपार होत असल्याने आजचा सोमवार हा नवी मुंबईकर आणि सिडकोसाठी महत्वाचा क्षण आहे. हे कठीण काम होते. जमीनीखाली शंभर मीटर खाली जाऊन यंत्र घेऊन जाऊन बोगदा खणणे त्यामध्ये ब-याच नैसर्गिक अडचणींचा सामना करावा लागतो तरी ॲफकॉन्स कंपनीच्या सर्वच सहका-यांनी कोणताही अपघात न करता पहिल्या टप्यातील काम पुर्ण दिलेल्या मुदतीपूर्वी केले हे कौतुकास्पद आहे. वाढती पाण्याची मागणी लक्षात घेऊन पुढील २५ वर्षांचे पाणी नियोजन आखणीनूसार सिडकोने पाण्याविषयी अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. हेटवणे जलबोगदा हा त्यापैकी एक भाग आहे. यामुळे दिडशे एमएलडी पाणी नवी मुंबईकरांना मिळू शकेल. ॲफकॉन्स कंपनीने ज्याप्रमाणे हे काम दिलेल्या मुदतीपेक्षा सहा महिने अगोदर काम पुर्ण करण्याचे नियोजन आखले. त्याचप्रमाणे इतर कंपन्यांनी सुद्धा दिलेल्या मुदतीत काम पुर्ण करावे, कारण सिडकोने मुदतवाढ देणे बंद केले आहे. इच्छा असेल तर मार्ग सापडतो याच उक्तीने सिडको यंत्रणेने विविध कंत्राटदारांना सोबत घेऊन अतिसुक्ष्म नियोजन करून नवी मुंबई विमानतळ प्रकल्प आणि हेटवणे जलबोगद्याचे काम करून दाखवले. या सकारात्मक उक्तीने सर्व यंत्रणेने काम करणे गरजेचे आहे.

**– विजय सिंघल, एमडी, सिडको मंडळ**

शहरांचे शिल्पकार या सिडकोच्या ब्रिदवाक्यानूसार सिडकोने रस्ते, इमारती व इतर सुविधांप्रमाणे शहर उभारले. शहराला लागणा-या २०५० सालापर्यंतचा पाणी आराखड्यानूसार सिडकोने हेटवणे धरण जलबोगदा प्रकल्प हाती घेऊन त्याचे काम पुर्ण केले. या व्यतिरीक्त न्हावाशेवा टप्पा ३, कोंढाणे, बाळगंगा अशा धरण प्रकल्पाचे काम गतिने केले जात आहे. या वेगवेगळ्या जलप्रकल्पातून शहरांना पाणी संपन्न बनविण्यासाठी सिडकोने हे नियोजन आखले आहे. सिडकोचे एमडी यांनी पदभार स्विकारल्यापासून ते आजपर्यंत प्रत्येक महिन्याला सिडकोच्या सुरू असलेल्या प्रकल्पातील प्रत्येक कंत्राटदार आणि सिडको अधिका-यांमध्ये होत असलेल्या दर महिन्यातील बैठकांचे फलश्रुत म्हणजे विमानतळ आणि जलबोगदा या कामांचे यश दिसून येते.

**– गणेश देशमुख, सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

### पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

## माध्यम संनियत्रण कक्षाने अत्यंत दक्षतेने व काटेकोरपणे काम करावे : मंगेश चितळे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या माध्यम माध्यम संनियत्रण कक्षाने अत्यंत दक्षतेने व काटेकोरपणे काम कराव. ज्यायोगे निवडणूक कामात अधिक पारदर्शकता येईल असे निर्देश निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले.



यावेळी त्याच्यासमवेत आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी नितीन साके उपस्थित होते.

पनवेल महापालिकेकडून माध्यम संनियत्रणासाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. यामध्ये निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे हे अध्यक्ष असून परिमंडळ-३ चे पोलिस उपायुक्त प्रशांत माहिते, आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, उपायुक्त प्रसेनजित कार्लेकर, जनसंपर्क अधिकारी नितीन साके सदस्य आहेत. मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कक्षामार्फत प्रसारमाध्यम संनियंत्रण करण्यात येणार आहे. निवडणूकीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षास अथवा उमेदवारास दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्युब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खाजगी एफ.एम.वाहिन्या, सिनेमागृह, सार्वजनिक ठिकाणचे ऑडिओ - व्हिज्युअल डिस्प्ले, ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हॉईस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे अशा कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे जाहीरात प्रसारित किंवा प्रसिध्द करावयाची असल्यास त्या प्रस्तावित जाहिरातींचे समितीकडून ‘पूर्वप्रमाणन’ म्हणजे ‘प्रसिध्दी अथवा प्रसारणापूर्वी मान्यता घेणे’ आवश्यक आहे. पूर्वप्रमाणन केले नसल्यास त्या जाहिरातीचे प्रसारण किंवा प्रसिध्दी करता येणार नाही याची नोंद घ्यावयाची आहे.

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून या निवडणूका मुक्त, निर्भय, पारदर्शक, नि:पक्षपातीपणे पार पडण्याकरीता सर्व माध्यमांवर जाहिरात प्रसारण, प्रसिध्दी व प्रचार याबाबत मा. राज्य निवडणूकाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीचे राजकीय पक्ष व उमेदवार तसेच प्रचार - प्रसिध्दी करणा-या सर्व प्रसार माध्यमांनी पालन करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## पनवेल महापालिका निवडणुकीसाठी महायुतीची अधिकृत घोषणा




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी, शिव-सेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांची महायुती आज (दि. २९) पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. या पत्रकार परिषदेत महायुतीच्या नेत्यांनी एकत्रितपणे उपस्थित राहून निवडणूक रणनीती आणि आगामी वाटचालीबाबत भूमिका स्पष्ट केली.

७८ जागांपैकी ७१ भाजप, ०४ शिवसेना, ०२ राष्ट्रवादी काँग्रेस तर ०१ जागा आरपीआय असा फॉर्म्युला यावेळी जाहीर झाला. शहरा-तील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेत पनवेल महापालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी व महायुतीच्या नेत्यांनी हि घोषणा केली. त्या अनुषंगाने पुन्हा एकदा पनवेल महानगरपालिकेत मोठा विजय मिळवत महायुतीची सत्ता येणार असल्याचा विश्वास महायुतीच्या नेते मंडळींनी व्यक्त केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, राष्ट्रवादी काँगेसचे नेते शिवदास कांबळे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनेचे महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, आरपीआयचे महानगर अध्यक्ष प्रभाकर कांबळे, भाजपचे माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू आदी उपस्थित होते. यावेळी महायुतीची घोषणा करताना पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती कटिबद्ध असून, आतापर्यंत राबविण्यात आलेल्या विकासकामांच्या जोरावर पुन्हा एकदा जनतेचा भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पनवेल महानगरपालिकेत स्थिर व सक्षम प्रशासन देण्यासाठी महायुती एकत्र आली असून, विकासाच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे नेत्यांनी स्पष्ट केले. शहरातील प्रत्येक प्रभागाचा समतोल विकास, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवणे आणि पारदर्शक कारभार हे महायुतीचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही सांगण्यात आले. त्याचबरोबर मंगळवार दिनांक ३० डिसेंबर रोजी महायुतीच्या सर्व उमेदवारांचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले.

## गोमांस विक्री प्रकरणी तिसरा फरार आरोपी पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीररीत्या गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनासह पनवेल शहर पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले होते. यावेळी गाडीचा चालक सराईत गुन्हेगार फरार झाला होता. त्याला अँटॉप हिल येथून पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यामुळे आरोपींची संख्या ३ झाली आहे.

या गुन्ह्यामध्ये मोनिउद्दीन शेख (रा. शिवाजीनगर, गोवंडी), पासू उस्मान कुरेशी (रा. मानखुर्द) हे दोन आरोपी पूर्वीच पकड्ण्यात आले होते तर फरार गाडी चालक आरोपी मोहम्मद अली अकबर अली शहा (रा. अँटॉप हिल, मुंबई) याला वपोनी नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील तुषार बोरसे, मिथुन भोसले, संदेश म्हात्रे व शशिकांत काकडे यांनी कोणतीही तांत्रिक मदत नसताना तसेच कोणतीही पूर्व माहिती उपलब्ध नसतानाही, गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार कौशल्यपूर्ण तपास करून अँटॉप हिल येथून ताब्यात घेतले आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात मुंबई येथील विविध पोलिस ठाण्यात विविध गुन्हे दाखल आहे. त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलिसांनी कलम ३२५, ३(५) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे.



## महानगरपालिका निवडणूक : शक्तीप्रदर्शन करत शेकापच्या चार उमेदवारांचे अर्ज दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल पालिकेच्या २० प्रभागातील ७८ जागांकरिता १५ जानेवारी रोजी निवडणूक पार पडणार आहे. या करता ३० डिसेंबरपर्यंत नामनिर्देश पत्र दाखल करता येणार असल्याने सोमवारी (दि.२९) अनेक उमेदवारांनी नामनिर्देश पत्र दाखल करण्यासाठी गर्दी केली होती. २९ डिसेंबरपर्यंत १ हजार ४५ अर्जांची विक्री झाली असून एकूण २९ उमेदवारांनी आपले नामनिर्देश पत्र दाखल केले असल्याची माहिती निवडणूक अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे. त्यात शेतकरी कामगार पक्षातर्फे अर्चना भोईर, योगिता फडके, अरविंद म्हात्रे आणि राम पाटील यांनी नामनिर्देश पत्र दाखल केले आहेत.

पनवेल महानगरपालिकेतील प्रभाग समिती ‘अ’ उपविभाग नावडे या अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १ मध्ये ३, प्रभाग क्रमांक २ मध्ये ५, प्रभाग क्रमांक ३ मध्ये ४, तर प्रभाग क्रमांक ४ मध्ये केवळ १ च अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रभाग समिती ‘ब’ मध्ये मोडणाऱ्या प्रभाग क्रमांक ९ व १० मध्ये प्रत्येकी २ दोन अर्ज दाखल करण्यात आले आहेत. प्रभाग समिती ‘क’ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक ११ मध्ये अर्ज दाखल करण्यासाठी सुरु असलेल्या प्रक्रियेदरम्यान २ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले. तर, प्रभाग क्रमांक १२ व १३ मधून प्रत्येकी १ अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रभाग समिती ‘ड’ पनवेल एक मधील प्रभाग क्रमांक १५ मधून २, तर प्रभाग क्रमांक १६ मधून ५ अर्ज दाखल केले आहेत. तसेच, प्रभाग क्रमांक १९ मध्ये एका उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अशा एकूण २९ उमेदवारांनी आपले नामनिर्देश पत्र दाखल केले आहेत.

दरम्यान, पालिका महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शेकापकडून मोठे शक्तीप्रदर्शन करत माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उमेदवारांचे नामनिर्देश पत्र दाखल करण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीकडून प्रभाग क्रमांक २ मधील सर्वच्या सर्व चार जागा शेतकरी कामगार पक्षाला सोडण्यात आल्या आहेत. त्यात अर्चना भोईर, योगिता फडके, अरविंद म्हात्रे आणि राम पाटील यांनी सोमवारी आपले नामनिर्देश पत्र दाखल केले आहेत. ऐन निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील भाजपाचे कार्यकर्ते असलेल्या राम पाटील यांनी शेकापमध्ये प्रवेश करून उमेदवारी मिळवली. त्यामुळे त्यांच्या प्रवेशाने प्रभाग क्रमांक २ मधील मविआची ताकत वाढली असल्याचा प्रत्यय कळंबोली-रोडपाली येथील पनवेल पालिकेच्या सुवर्ण दुर्ग या कार्यालया बाहेर कार्यकर्त्यांनी केलेल्या गर्दीतून आला आहे. यावेळी, प्रभाग क्रमांक २ मधील आघाडीच्या चारही उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वास माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी बोलून दाखवला आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि कु.निखिल महेश ओसवाल व इतर १ यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४७ | ३-०५-३० | ०.८९ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील कु.निखिल महेश ओसवाल व इतर १ यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ३०/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे उसर्ली बुद्रूक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – ऊसर्लीबुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) श्री.जयदास नामदेव म्हात्रे<br>२) श्री.प्रदीप नामदेव म्हात्रे<br>३) श्री.प्रभाकर नामदेव म्हात्रे<br>४) श्री.कृष्णा नामदेव म्हात्रे | ६५/४/ब | ०-३०-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-३१-०० | ३.३९ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्य व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ.क्षमा संजय ओसवाल यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ६० | ०-२४-०० | ०.१० |
| ६१/१ | १-५०-०० | ०.४५ |
| ६१/२ | १-५५-०० | ०.४५ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सौ.क्षमा संजय ओसवाल यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ३०/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि श्री.विशाल जयंत ओसवाल व इतर १ यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४१/१ | १-००-८० | १५.८१ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री.विशाल जयंत ओसवाल व इतर १ यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ३०/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि श्री.संजय सुभाष ओसवाल यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४६ | ०-२५-३० | ०.१२ |
| ८० | २-०२-०० | २.७८ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री.संजय सुभाष ओसवाल यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ३०/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे करवले बुद्रूक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिल मे. संधन बिल्डटेच व ताराबाई काळूराम दिंडे, पत्ता ९०४, ए विंग, निल वर्धमान, सेक्टर-५, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६ यांना कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – करवले बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.उमेश निवृत्ती चौधरी | ८४/१/२/१ | ०-६७-०० | २.०० |
| पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे नांवे असलेले क्षेत्र | | ०-२०-०० | ०.६० |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्य व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ.गिता प्रकाश पालरेचा यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४८ | ०-७३-०० | ०.१७ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सौ.गिता प्रकाश पालरेचा यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ३०/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि श्री.संजय सुभाष ओसवाल यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४० | १-५८-०० | ३.५० |
| ४१/२ | ०-९२-४० | ०.६० |
| ४३ | २-३१-०० | ०.५० |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री.संजय सुभाष ओसवाल यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ३०/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

Borade-Kapoor Judge

Adv.Priyanka Patil
7030541688
Adv.Darshana Sapkal
9320232943

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL AT PANVEL
CIVIL MISC. APPLICATION NO. 1523 OF 2024
Exh No.19/D

1. SMT. NIKITA NITIN PAWAR
Aged about 49 years, Occupation- Housewife
Residing at Flat No. 302, Pasayadan CHS,
Sector-21, Plot no. 48A, Kharghar,
Raigarh, Maharashtra - 410210.
2. MISS. SAKSHI NITIN PAWAR
Aged about 24 years, Occupation- Service
Residing at Flat No. 302, Pasayadan CHS,
Sector-21, Plot no. 48A, Kharghar,
Raigarh, Maharashtra - 410210 APPLICANTS
V/S
NIL OPPONENT

That, Applicant No.1 is the wife and Applicant no. 2 is daughter of Late Nitin Dattaram Pawar who died on 21/07/2021 at Flat No. 302 Pasaydan CHS, Plot No-48A, Sector 21, Kharghar, Raigarh, Maharashtra -410210.

That, during the lifetime of the deceased Late Nitin Dattaram Pawar had Allotted the immovable property viz Flat No. 302, Pasaydan Co-op. Hsg. Society Ltd., Plot no. 48A, Sector- 21, Kharghar, Navi Mumbai.

Whereas the above named Applicant has filed Misc Application for Heirship Certificate under Bombay Regulation VIII of 1827, the Court of Civil Judge (SD) Panvel, Panvel.

You the member of Public are hereby given Notice to appear in the Court of Civil Judge (SD) Panvel, At, in person or by pleader duly instructed and to file your say/objection if any within 30 (thirty) days from the date of publication of this public notice. Failing which said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under hand and seal of the court this 19 day of 11/25

| Sd/- | | Sd/- |
|---|---|---|
| Jr.Clerk<br>Civil Judge (S.D.)<br>Panvel | Court Seal | Asst.Supted.<br>Civil Judge (S.D.)<br>Panvel |

**दैनिक रायगड नगरी**
**बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**संपर्क : ९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड, येथील खाली सविस्तरपणे नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याबाबत चर्चा चालु आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड**

| जमीन मालकाचे नांव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.भगवान दामु पाटील<br>आंबी जाणु तांडेल<br>निलेश गोपाळ भोपी<br>दिपक गोपाळ भोपी<br>लता गोपाळ भोपी<br>ललिता रामचंद्र पाटील<br>पदमा अर्जुन पवार<br>गुलाब गोपाळ भोपी<br>निर्मला गोपाळ भोपी<br>सुष्मा गोपाळ भोपी<br>सिताबाई दामु पाटील<br>जनार्द्रन भिवा पाटील<br>दत्तात्रेय भिवा पाटील<br>गुलाब गोविंद झिंगे<br>माई दत्तात्रेय ठोंबरे<br>भागीरथी भिवा पाटील<br>संगिता बाळा पाटील<br>लता नरेश कोळी<br>अंजु नंदकुमार पाटील<br>हर्षला हेमंत म्हात्रे<br>जुईली जितेंद्र पाटील<br>दिपक काशिनाथ पाटील<br>प्रकाश काशिनाथ पाटील<br>सायली रामचंद्र माळी<br>लक्ष्मण रामचंद्र पाटील<br>राम आंबो पाटील<br>जनाबाई तुकाराम माळी<br>शैला सुनील पवार<br>जनाबाई अनंता पाटील<br>कैलास अनंता पाटील<br>भुमिका भरत पाटील<br>भागेश्री अनंता पाटील<br>अर्चना अनंता पाटील<br>मनिषा महादेव पाटील<br>मिनल महादेव पाटील<br>उज्वला सखाराम पाटील<br>सुषमा नामदेव फडके<br>करिश्मा सखाराम पाटील<br>सौरभ सखाराम पाटील<br>सुरशे चाहू पाटील<br>द्रौपदी श्रावण काकडे<br>सुमन सुभाष झेंडे<br>रिना गजानन भोईर<br>रूक्मिणी विठठल ठोंबरे<br>जनार्द्रन सावळराम पाटील<br>विद्या देवेंद्र पाटील<br>जानवी देवेंद्र पाटील<br>कविराज देवेंद्र पाटील<br>अ.पा.क. आई विदया देवेंद्र पाटील<br>शंकर अनंता पाटील<br>राधा कृष्णा पाटील<br>भास्कर कृष्णा पाटील<br>भारती भरत शेळके<br>राधा कानु पाटील<br>रंजना कानू पाटील<br>अनिता दिपक ठाकुर<br>संदिप कानु पाटील<br>श्रीकांत कानु पाटील<br>भारती भगवान पाटील<br>मनिषा दिलीप मंडळ<br>विजय भगवान पाटील<br>भाविका भगवान पाटील<br>तेजेस भगवान पाटील<br>कविता नारायण पाटील<br>साक्षी नारायण पाटील<br>सिध्दी नारायण पाटील<br>अ.पा.क. आई कविता नारायण पाटील<br>रिध्दी नारायण पाटील<br>अ.पा.क. आई कविता नारायण पाटील<br>निरा गणपत पाटील<br>मिनाक्षी मुरलीधर ठाकुर<br>संजय गणपत पाटील<br>अजय गणपत पाटील<br>वनिता काशिनाथ पाटील<br>रोहिणी बाळकृष्ण पाटील<br>भुषण काशिनाथ पाटील<br>योगिता महेंद्र पाटील<br>हर्षदा दिगंबर पाटील<br>शोभा गुरूनाथ पाटील<br>हिरा कान्हा पाटील<br>पदमा संभाजी पाटील<br>ज्योती रमेश शेलार<br>दिनेश गणू पाटील | ७८ | ०-३८-००<br>एकूण ०-३८-००<br>इतके क्षेत्र | १.४७ |

तरी सदरहू वर नमुद मिळकतींबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न-आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**साहिल राजेंद्र निगुडकर**
**ॲडव्होकेट, पनवेल**

**पत्रव्यवहाराचा पत्ता: फ्लॅट नं. १०१-२०२, जी विंग, शिवम कॉम्पलेक्स, मुंद्रे (बु), कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१**

# वनश्री शेडगे यांनी रोहा नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा अष्टमीकर जनतेने दाखविलेल्या विश्र्वासामुळे आणि खा. सुनिल तटकरे, मंत्री अदिती तटकरे व माजी आम. अनिकेत भाई तटकरे यांच्या प्रयत्नाने मला रोहा अष्टमी नगर पालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोठया फरकाने यश मिळाले. शहराचा सर्वांगीण विकास करताना रोहा अष्टमीकर जनतेच्या विश्वासाला आपण कदापी तडा जाऊ देणार नाही असे वक्तव्य रोहा नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे यांनी आज पदभार स्वीकारला त्या प्रसंगी व्यक्त केले.



रोहा अष्टमी नगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका २ डिसें. रोजी पार पडल्या तर २१ डिसें. रोजी जाहीर झालेल्या निकालात रोहा नगर पालिकेच्या नगराध्यक्षपदी वनश्री समीर शेडगे बहुमतांनी निवडून आल्या. आज सोमवारी वनश्री शेडगे यांनी नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला असून त्यांना शुभ आशीर्वाद व शुभेच्छा देण्यासाठी मंत्री आदिती तटकरे, माजी आम अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, तालुका अध्यक्ष विनोद पाशीलकर, शहर अध्यक्ष अमित उकडे उपस्थित होते, वनश्री शेडगे यांनी गट नेते महेंद्र गुजर व नवनिर्वाचित नगरसेवक राजेंद्र जैन, अहमद दर्जी, रवींद्र चाळके,पूर्वा मोहिते, स्नेह अंबरे,निता हजारे, फराहा पानसरे, प्रशांत कडू, अलमास मुमेरे,अफरीन रोगे, महेश कोलटकर, गौरी बारटक्के, संजना शिंदे, अरबाज मणेर, अजित मोरे, प्रियंका धनावडे यांच्यासमवेत नगरपालिकेत येऊन पदभार स्वीकारला. यावेळी मोठ्या संख्येने रोहा अष्टमीकर बांधव रोहा नगर पालिकेत उपस्थित होते. सकाळी ११ वा. राममारुती चौक ते नगर पालिका कार्यालया पर्यंत नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांची फटाक्यांची आतषबाजी ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणुक काढण्यात आली.

## महाविकास आघाडीकडून यतीन देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका निवडणूकसाठी प्रभाग १६ मधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उम्मेदवार यतीन विनायक देशमुख यांनी आज उमेदवारी अर्ज भरला.

यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, महानगरप्रमुख अवचित राऊत, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, पनवेल शहर प्रमुख प्रविण जाधव आणि शिवसैनिक उपस्थित होते.

## ‘थर्टी फर्स्ट’ला धिंगाणा घालाल तर ‘हॅप्पी न्यू इयर’ कोठडीत होणार!

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री जागोजागी पार्ट्या होतात. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, मारामारीचेही प्रकार यावेळी घडतात. त्यातच निवडणुकांचा हंगाम सुरू असल्याने पोलिस प्रशासनाची चिंता वाढली आहे. थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशास-नाची देखील तयारी सुरू आहे. थर्टी फर्स्टच्या दिवशी धिंगाणा घातला तर प्रशासनाकडून कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे मध्य प्राशन करून वाहन चालवू नका आणि कारवाईचे संकट स्वतःहून ओढवू नका असे आवाहन केले जात आहे.

मद्य प्राशन करून वाहन चालवल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. ब्रेथ मशीनद्वारे वाहन चालकाची तपासणी करून कारवाई होणार आहे. पनवेल महानगरपालिकेची निवडणूक सुरू असल्याने यंदाची थर्टी फर्स्ट जंगी होणार आहे.

पनवेल तालुक्यात अनेक फार्म हाऊस आ-हेत. या फार्म हाऊसचे यापूर्वीच बुकिंग झालेली आहे. थर्टी फर्स्ट च्या दिवशी अनेक जण फार्म हाऊसमध्ये जाऊन मौज मजा करतात. आणि नववर्षाचे स्वागत करतात. पनवेल तालुका पोलिसांद्वारे खारपाडा, कोन, नेरे येथे नाकाबंदी असणार आहे. तर पनवेल वाहतूक शाखेतर्फे आदई सर्कल, ठाणा नाका गार्डन हॉटेल सिग्नल, शिवशंभो नाका पनवेल, वडघर नाका, उरण नाका ब्रिज या ठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे.

पनवेल तालुका पोलिसांतर्फे २ पीआय, ८ पीएसआय/एपीआय, ४८ पोलीस स्टाफ असे एकूण ५८ पोलीसांचा वॉच राहणार आहे तर पनवेल वाहतूक शाखेचे तीन ऑफिसर आणि २० स्टाफ यावेळी विविध ठिकाणी हजर राहणार आहेत. मद्यपींमुळे इतरांच्या जीवाला धोका असतो. मदय प्राशन करून वाहन चालवल्याने अपघात होण्याची शक्यता असते तसेच वाहन दुसऱ्या वाहनाला धडकून मोठा अपघात होऊ शकतो आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. मद्य प्राशन करून वाहन चालवल्यास दहा हजार रुपयाचा दंड आहे. त्यामुळे वाहन चालवताना मदय प्राशन करून वाहन चालवू नका असे आवाहन करण्यात येत आहे.

## मोबाईलपासून मुलांना वाचवा : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उलवे**

वाचाल तर वाचाल असे म्हटले जाते, ते खरे आहे. महाविद्यालयीन जीवनात मी लायब्ररीत बसून अनेक पुस्तकांचा फडशा पाडला. त्यामुळे साहजिकच वाचनाची गोडी लागली.



आजही सर्व वृत्तपत्रे आणि विमान प्रवासातही पुस्तके वाचतो. चौकमध्ये १९२० पासून वाचनालय सुरू आहे. वाचनालय सुरू करून त्याला १०६ वर्षे झालीत. वाचनालयाला ऐतिहासिक वारसा आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. आज तुपगावमध्ये ओमकार वाचनालय व ग्रंथालय सुरू करून आपण एक उत्तम काम केले आहे. त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन.

आज जमाना बदललाय, त्यामुळे कालानुरूप डिजिटल लायब्ररीही हवी. समाजाचे आपण देणे लागतो, त्यानुसार मी काम करतो. जिथे गरज तिथे मी सहकार्य करतोय. आपल्या ताटातील अर्धी भाकर देण्याची दानत हवी. जेवढे वाचाल तेवढे आपण प्रगल्भ होतो.

मी विचारांची लढाई लढतोय. जे जे चांगले करता येईल ते ते करा, पसायदानात ज्ञानेश्वर माऊलींनी जगाच्या कल्याणाचा विचार केलाय. अलीकडे मोबाईलमुळे लाईफस्टाईल बदलली आहे. घरातील महिलाही लहान मूल रडतेय म्हणून हातात मोबाईल देऊन त्याला गप्प बसवण्याचा प्रयत्न करतात. हे अत्यंत चुकीचे आहे, कारण मोबाईलच्या स्क्रीनमुळे लहान मुलांच्या डोळ्यांवर गंभीर परिणाम होतो. तसेच ते लहान मूल पुढे हट्टी होऊन हातात मोबाईल असल्याशिवाय काही खात-पित नाही. त्यामुळे मुलांना मोबाईलपासून वाचवा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी तुपगाव-चौक येथे केले.

त्यांच्या हस्ते ओमकार वाचनालय व ग्रंथालयाचे रविवारी (ता. २८) उद्घाटन झाले. यावेळी वाचनालयाच्या वतीने महेंद्रशेठ घरत यांचा सन्मान करण्यात आला. ते पुढे म्हणाले, पुस्तके ही काळाची गरज आहे, वाचन संस्कृती जोपासण्यासाठी आपण हाती घेतलेला उपक्रम उत्तम आहे. त्यामुळे ५१ हजारांची मदत पुस्तकांसाठी करतोय. आपणास हवी ती विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी पुस्तके खरेदी करा.

माजी सरपंच शांताराम भधे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, काँग्रेसचे युवा अध्यक्ष निखिल ढवळे, तालुका अध्यक्ष देविदास म्हात्रे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विनायक देशमुख, उद्योजक आप्पा देशमुख, विनोद भोईर, दिनेश गावडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश मागावकर यांनी केले.

## पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ११,४६० दुबार मतदार आढळले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आगामी पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील घोळांवर अखेर पडदा पडू लागला आहे. प्रारूप मतदार यादीमध्ये २१,१६२ मतदार दुबार व बोगस असल्याच्या हरकती महापालिकेकडे प्राप्त झाल्या, याची महापालिकेने सखोल छाननी केल्यानंतर तब्बल ११,४६० दुबार मतदार आढळून आले असून, या मतदारांकडून हमीपत्र घेण्यासाठी निवडणूक विभागाने प्रत्यक्ष क्षेत्रीय मोहीम हाती घेतली आहे. पुढील काही दिवसांत निवडणूक विभागाचे कर्मचारी घरोघरी भेटी देऊन संबंधित मतदारांकडून एका मतदान केंद्राची निवड निश्चित करून घेणार आहेत.

पनवेल महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत असून, १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या ५,५४,५७८ मतदारांच्या प्रारूप यादीवर २९,४०६ हरकती दाखल झाल्या होत्या. यामध्ये स्वता मतदारांनी नोंदविलेल्या ५,५२६ तर इतरांनी नोंदविलेल्या १२,८५२ हरकतींचा समावेश होता. दुबार व संशयास्पद मतदारांबाबत एकूण २१,१६२ हरकती प्राप्त झाल्या, तसेच ९४५ मृत मतदारांची नावे यादीत असल्याचाही दावा करण्यात



आला होता. या हरकतीनंतर निवडणूक विभागाने सॉफ्टवेअर प्रणालीच्या मदतीने छायाचित्रांची तुलना, नावे, पालकांची माहिती आणि पत्ता यांची पडताळणी केली. ही प्रक्रिया १९ पर्यवेक्षकांच्या देखरेखीखाली राबविण्यात आली.

तपासणीनंतर ११,४६० मतदार दुबार असल्याचे स्पष्ट झाले. या मतदारांना दोनपैकी कोणत्या एका मतदान केंद्रावर मतदान करायचे आहे, याबाबत विकल्प स्वरूपाचे हमीपत्र भरून घेतले जाणार आहे.जे मतदार त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सापडणार नाहीत किंवा माहिती देणार ना-हीत, त्यांच्याकडून मतदानाच्या दिवशीच मतदान केंद्रावर हमीपत्र घेतले जाईल. प्रभागनिहाय बीएलओ पथकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. हमीपत्र दिल्यानंतरही एखाद्या मतदाराने दोन ठिकाणी मतदान केल्याचे आढळल्यास त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिला आहे.दरम्यान, दुबार व संशयास्पद मतदारांच्या मुद्द्यावर शिवसेना, शेकापसह विविध राजकीय पक्षांनी आक्षेप घेतला होता. काही प्रभागांत मोठ्या प्रमाणात हरकती नोंदविल्या गेल्याने हा विषय चर्चेत आला होता. दोषमुक्त अंतिम मतदार यादीच्या आधारेच निवडणूक कार्यक्रम राबवावा, अशी मागणी या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केली होती.

## उरण तालुक्यातील १०५ पैकी ७५ सीसीटीव्ही कॅमेरे विज जोडणी अभावी बंद

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील अनेक मोक्याच्या ठिकाणी बसविण्यात आलेले १०५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यापैकी फक्त ३० कॅमेरेच सुरू आहेत.विजेच्या जोडणी अभावी ७५ सीसीटीव्ही कॅमेरे अद्यापही मागील काही महिन्यांपासून बंद पडले आहेत.

ऐन सणासुदीमध्येच जनतेच्या सुरक्षेसाठी आणि पोलिसांच्या विविध तपास कामांसाठी उपयुक्त ठरणारा तिसरा डोळाच निकामी ठरला आहे.बंद पडलेल्या सीसीटीव्हीमुळे मात्र उरणकरांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे.

जेएनपीए अंतर्गत असलेली आंतरराष्ट्रीय स्तरावरील खासगी पाच बंदरे,त्यावर आधारित उभारण्यात आलेल्या शेकडो कंटेनर यार्ड,सीएफएल, कंपन्यांमुळे उरण परिसर औद्योगिकदृष्ट्या प्रगती पथावर आहे. येत्या दोन वर्षांत या बंदरातून एक कोटी कंटेनर मालाची चढउतार होणार आहे.

त्यामुळे उरण आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठ म्हणून ओळ-खली जाऊ लागली आहे.त्यानंतर आता मुंबई आणि उरण तालुक्याला जोडणाऱ्या अटल सेतू आणि रेल्वे प्रवासी वाहतूक सुरू झाल्यानंतर मुंबई -उरण अंतर तर अवघ्या ६० मिनिटांवर आले आहे.या वाढत्या औद्यौगिकीकरणामुळे लोकसंख्याही वाढतच चालली आहे.त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीमध्ये देखील वाढ झाली आहे. यामध्ये हत्या आणि चोरीच्या गुन्ह्यांमध्येही वाढ झाली आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांना सीसीटीव्ही कॅमेरे उपयुक्त ठरतात.मात्र उरण परिसरात ठिकठिकाणी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे अनेक महिन्यांपासून निकामी अथवा बंद पडलेले आहेत.

तर रेल्वे स्थानक परिसर आणि काही मोक्याच्या ठिकाणी अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे.मागील काही महिन्यांपासून उरण परिसरात हत्या, चोऱ्या आणि इतर गुन्ह्याचे प्रमाण वाढीस लागले आहेत.मात्र पोलिसांसाठी महत्वाचा दुवा ठरणारा तिसरा डोळाच निकामी ठरल्याने उरणची सुरक्षा सध्या रामभरोसे उरली आहे.यामुळे पोलिसांनाही अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.यामुळे उरण परिसरातही सध्या भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.मात्र पोलिसांसाठी महत्वाचा दुवा ठरणारा तिसरा डोळाच निकामी ठरल्याने पोलिसांनाही अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

उरण परिसरातील अनेक मोक्याच्या व आवश्यक ठिकाणी १०५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.त्यापैकी सध्याच्या घडीला फक्त ३० सीसीटीव्ही कॅमेरेच सुरू आहेत. वीजपुरवठ्या अभावी बसविण्यात आलेले ७५ सीसीटीव्ही कॅमेरे अद्यापही बंद आहेत.

सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करण्यासाठी येथील स्थानिक पा-तळीवर ओएनजीसी, गृहविभाग,उरण नगरपरिषद आणि संबंधित शासकीय विभागाकडे संपर्क साधण्यात आला आहे.अशी माहिती उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हनीफ मुलाणी यांनी दिली आहे.

## वाढत्या पर्यटनाचा नागरी सुविधांवर ताण, रायगड जिल्ह्यात वाहतूक व्यवस्था कोलमडली

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील वाढत्या पर्यटनाचा नागरी सुविधांवर ताण पडण्यास सुरवात झाली आहे. पायाभुत सुविधांचा आभाव आणि क्षमतेपेक्षा जास्त येणारे पर्यटक यामुळे पर्यटनस्थळांचा कोंडमारा होत असल्याचे दिसून येत आहे.



रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, काशिद, नागाव, मांडवा, किहीम, आवास, आक्षी, रेवदंडा हि ठिकाणे गेल्या काही वर्षात न्यू इअर डेस्टीनेशन म्हणून नावारुपास आली आहेत. मुंबईपासून जवळ असल्याने, राहण्याची आणि जेवणाची मुबलक सोय असल्याने दरवर्षी मुंबईतील लाखो पर्यटक नवीन वर्षाच्या स्वागतासाठी या परीसरात येऊ ला-गली आहे. यामुळे स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. पण दुसऱ्या बाजूला स्थानिक नागरी सुविधांवर याचा प्रचंड ताण निर्माण पडत आहे. त्यामुळे पर्यटनाच्या अनुषंगाने येथील पायाभुत सुविधांचा विकास होण गरजेच आहे. अलिबाग आणि मुरुड या तालुक्यात गेल्या चार दिवसात साधारणपणे दिड ते दोन लाख पर्यटकांनी हजेरी लावली, माथेरान, दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन हि ठिकाणही पर्यटकांनी गजबजून गेले होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकाच वेळी पर्यटक दाखल झाल्याने, वाहतूक समस्यातर उद्भवलीच, पण स्थानिक प्रशासनाकडून पुरवल्या जाणाऱ्या सुविधांवर त्याचा ताण पडला.

अलिबाग शहरा पुरता विचार करायचा झाला, हॉटेल व्यवस्था, वाहतुक व्यवस्था, पोलीस यंत्रणे-वरही अतिरीक्त ताण आला. यामुळे ऐतिहासिक आणि निसर्गरम्य ठिकाण म्हणून प्रसिध्द असलेले अलिबाग मुंबईतील गर्दीप्रमाणे कोंडलेले पहायला मिळाले. हॉटेल्स आणि लॉजेसच्या शोधात पर्यटक रात्रभर फिरत होते. अरुंद रस्त्यांवर वाहनांची गर्दी झाली होती. पार्कींगच्या सुविधा कमी पडत होत्या. अलिबाग हे केवळ एक उदाहरण आहे. जिल्ह्यातील बहुतांश पर्यटन थोडीफार अशीच परिस्थिती होती. ही बाब लक्षात घेऊन या पर्यटन केंद्रांच्या पायाभुत विकासाला चालना देणे गरजेचे आहे. राज्यातील इतर भागांच्या तुलनेत दरवर्षी अलिबाग मुरुड परी-सरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेतली तर ती कितीतरी अधिक आहे. त्यामुळे मागील काही वर्षात इथे २ हजारहून अधिक हॉटेल्स, लॉजेस आणि निवास न्याहरी केंद्र उभी राहिली आहेत. पण ज्या प्रमाणात पर्यटकांची आणि हॉटेल्सची संख्या वाढते आहे. त्या प्रमाणात रस्ते, वीज, पाणी, पार्कीग, सार्वजनिक स्वच्छतागृह या सुविधा विकसीत झालेल्या नाहीत. स्थानिक ग्रामपंचायती आणि नगरपालिकांचे उत्पन्न मर्यादीत असल्याने, या सुविधा विकासित करणे त्यांना शक्यही होत नाही. त्यामुळे राज्यसरकारने या ठिकाणांचा पर्यटन पूरक विकास करणे गरजेच आहे. त्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून निधी उपलब्ध करून देण गरजेच आहे.

रायगड जिल्ह्यातील ५९ गावांच्या पर्यटन विकासासाठी २४३ कोटी रुपयांचा पर्यटन विकास आराखडा तयार करण्यात आला होता. मात्र दोन वर्ष उलटली तरी राज्य सरकारकडून आराखड्याला मंजुरी मिळालेली नाही. एकीकडे रायगड किल्ल्याच्या विकासाठी ६०० कोटी आराखडा मंजुर झाला आहे तर दुसरीकडे जिल्ह्यातील इतर पर्यटन स्थळांना निधीची वानवा आहे असे विरोधाभासी चित्र सध्या पहायला मिळत आहे. अलिबाग हे मुंबईशी जलवाहतुकीचे जोडले आहे. दररोज साधारणपणे तीन ते साडे तीन हजार लोक जलमार्गाने प्रवास करतात.

आठवड्याच्या शेवटी हि संख्या दहा ते बारा हजारांच्या घरात झाते. मात्र २४ डिसेंबर ते २८ डिसेंबर या चार दिवसा ६० ते ७० हजार पर्यटकाांनी या जलवाहतुकीचा वापर केला पर्यटकाांची संख्या लक्षात घेऊन जादा प्रवासी बोटी सोडण्यात आल्या होत्या मात्र तरीही देखील ही व्यवस्था अपुरी पडत होती.

नाताळाची सुट्टी साजरी करून रविवारी अलिबागमध्ये आलेले पर्यटक परतीच्या प्रवासाला निघाले. त्यामुळे सकाळपासूनच अलिबाग एसटी बसस्थानकात पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. मात्र अलिबाग आगारातून सुटणाऱ्या बहुतांश गाड्या आधीच आरक्षित झाल्याने प्रवाशी मोठ्या प्रमाणात अडकून पडले. ही बाब लक्षात घेऊन आगारातून जादा बसेस सोडण्यात आल्या. मात्र प्रवाश्यांची संख्या जास्त असल्याने एसटीची सेवा अपुरी पडत असल्याचे या निमित्याने दिसून आले.